नि.दि.दावा क्र. ५७८/२०१४
निशाणी क्र. ६४ खाली

**वादीचा सरतपास वादीचे तर्फे वकील श्री. जी.बी.खरसडे यांचे मार्फत –**

शपथपत्रातील मजकूर माझे सांगणेप्रमाणे लिहीण्यात आला असून तो बरोबर आहे. शपथपत्र वकिलांनी वाचून दाखविल्यानंतर मी अंगठा केला आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र. २ तर्फे वकील श्री. आय.डी. शेख यांचे मार्फत –**

मी अशिक्षीत आहे. मी अंगठा करतो. मला एक सख्खा भाऊ आहे, त्याचे नाव राजाभाऊ आहे. मला व माझे भावाला वडीलार्जित साडे बारा एकर जमीन होती. मला वडीलार्जित सव्वा सहा एकर जमीन आहे. आम्ही काही जमीन विकत घेतलेली आहे त्यामुळे आमच्याकडे प्रत्येकी सात एकर जमीन आहे. मी व माझे भावाने जमीन विकलेली नाही. प्रतिवादी सुनिल मिळुन तीघे भाऊ आहेत. प्रतिवादी सुनिलला चार एकर जमीन होती. प्रतिवादी सुनिलने दोन एकर जमीन फुलचंद माळी याला विकली. सुनिलने दोन एकर जमीन प्रतिवादी क्र. २ भिसे यांना विकली. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सावकारकीत विकली. प्रतिवादी क्र. १ सुनिल व प्रतिवादी क्र. २ भिसे यांचेमध्ये झालेल्या जमीनी विक्रीच्या ठरावावेळेस तसेच खरेदीवेळेस मी नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी ठरावावेळेस तसेच खरेदीवेळेस हजर नव्हतो त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ मध्ये जमीनीच्या व्यवहाराबद्दल मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ भिसे यांनी प्रतिवादी क्र.१ सुनिला याला रक्कम कुठे दिली, कधी दिली व किती दिली हे मला माहित नाही.

माझे वडीलांचे नाव जालिंधर आहे व प्रतिवादी क्र. १ सुनिलच्या वडीलाचे नाव बबन आहे. बबन आणि जालिंधर हे दोघेही सख्खे भाऊ आहेत. मी आणि प्रतिवादी क्र. १ सुनिल सख्खे चुलत भाऊ आहे. सुनिल हा गावी रहात नाही. सुनिलचे पत्नी व मुलगा कौडगाव येथे माझेजवळ रहातात. प्रतिवादी सुनिलचे आधार कार्ड, रेशनकार्ड व मतदान कार्ड कौडगाव येथील आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या

आधार कार्ड, रेशनकार्ड व मतदान कार्डवर वादींचा जो पत्ता आहे, तोच प्रतिवादी सुनिलचा पत्ता नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ सुनिल त्याची पत्नी वादी रंजना व मुलगा प्रितम हे कौडगाव येथे एकत्र कुटुंबात रहातात. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ सुनिलने वादी मार्फत संगनमत करुन दाखल केलेला आहे.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ सुनिल व वादी रंजना तसेच प्रितमचे आजही एकत्र कुटुंब आहे व कुटुंब प्रमुख प्रतिवादी क्र. १ सुनिल हा आहे. आज प्रतिवादी क्र. १ सुनिल न्यायालयात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुनिलनेच न्यायालयात मला आणले. हे म्हणणे खरे नाही की, वादी रंजना तसेच प्रतिवादी क्र. १ सुनिलचा खरेदीखत करणे, नंतर दबाव आणुन खरेदीखत पलटवुन घेणे असा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की, फुलचंद माळीला विकलेली जमीन त्याला दापदडप करुन त्याला केस करण्याची धमकी देवुन पलटवुन घेतलेली आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, फुलचंदकडुन जमीन प्रितमने सोडुन घेतली व फुलचंदला रक्कम प्रितमने दिली. ज्यावेळेस फुलचंदकडुन दस्त पलटवुन घेतला त्यावेळेस प्रितमचे वय दोन वर्षे होते. फुलचंद मानेला त्यावेळेस रुपये १,३५,०००/- प्रितमने व त्याचे आईने दिले होते. प्रितमच्या आईचा वादी रंजनाचा शेती व्यवसाय होता. ते खरेदीखत पलटवुन घेताना मी होतो. त्यावेळेस कोण साक्षीदार होते हे मी सांगु शकत नाही.

प्रतिवादी क्र. १ सुनिल हा व्यसनी असल्याबद्दल व त्याचेसोबत कोणी व्यवहार करु नये याबद्दल आम्ही जाहिर नोटीस दिली नव्हती. मी वादी रंजना तसेच प्रितमला तशी नोटीस देण्यास सुध्दा सांगितलेले नाही. प्रतिवादी क्र. १ सुनिल व्यसनी असल्याबद्दल कोणत्याही केसेस झाल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सुनिल व रंजना हे पैसे घेवुन चैन करीत असतात व फिरत असतात. साक्षीदार

स्वतःहुन सांगतो की, फक्त सुनिल फिरतो. दस्त क्र. ६५३/२००४, १६६८/२००८ हे कोणाकडुन लिहुन घेतले व कोणत्या गटाचे आहे हे मी सांगु शकत नाही.

सुनिलला वाटपामध्ये किती जमीन वाटुन आली होती हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. ६०/१ क्षेत्र ०१ हे ०६ आर तसेच सर्वे क्र. ६०/२ क्षेत्र ०१ हे ०४ आर या जमीनी वाटुन आल्या होत्या. त्या जमीनीपैकी ८१ आर जमीन वादी प्रितमच्या नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, २३ आर जमीन सुनिलच्या नावावर नोंदलेली आहे. सुनिल व प्रतिमच्या नावावर नोंदणी असलेल्या जमीन दाव्यात समाविष्ट नाहीत. वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे रहाते घर सोनारी कौडगाव रोडवर आहे.

हे म्हणणे खरे आहे की, वडीलार्जित सर्वे क्र. ६०/१ क्षेत्र ०१ हे ०६ आर तसेच सर्वे क्र. ६०/२ क्षेत्र ०१ हे ०४ आर या जमीनी प्रतिवादी क्र. १ सुनिल, त्याचा भाऊ आप्पा व त्यांचे वडील बबन पडुळकर यांच्या दरम्यान झालेल्या वाटपात वाटुन आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे क्र. ६०/२ पैकी ८१ आर क्षेत्र फुलचंद मानेकडुन एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातुन सोडवुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, त्या जमीनीवर प्रतिवादी क्र. १ सुनिल तसेच वादी प्रितम व रंजना यांची संयुक्त वहिवाट आहे.

प्रश्न – सुनिलला प्रापंचिक अडचण भासल्यामुळे त्याने सन २०१२ मध्ये सर्वे क्र. ६०/१ पैकी ८१ आर जमीन कुटुंब प्रमुख म्हणुन प्रतिवादी क्र. २ ला विक्री करुन दिली ?

उत्तर – हे म्हणणे खरे नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सुनिलने त्याच्या चैनीसाठी जमीन विकली.

हे म्हणणे खरे नाही की, विक्री केली त्यावेळेस प्रतिवादी क्र. १ सुनिलने कुटुंब

प्रमुख म्हणुन प्रतिवादी क्र. २ यास ताबा दिला. हे म्हणणे खरे नाही की, पूर्वेला बळीराम हजारे, पश्चिमेला आप्पा पडुळकर यांची जमीन, दक्षिणेस वादीची व प्रतिवादी क्र. १ ची शिल्लक जमीन व उत्तरेला सरकारी रस्ता या वर्णनाचे जमीनीचा कब्जा प्रतिवादी क्र. २ ला दिला. खरेदी अधारे प्रतिवादी क्र. २ चे नाव जमीनीच्या ७/१२ वर लागले आहे.

प्रतिवादी क्र. १ सुनिल व माझी भेट होत नाही. हे मला माहित नाही की, सन २०१२ साली प्रतिवादी क्र. २ भिसेकडुन रुपये ३,००,०००/– उसने घेतलेले होते. हे मला माहित नाही की, त्यापैकी रुपये २०,०००/– सुनिलने प्रतिवादी क्र. २ ला दिनांक ०५.०८.२०१४ रोजी परत केली.

प्रश्न – प्रतिवादी क्र. १ हा लोकांकडुन इसार घेतो व खरेदीखत करुन न देता निघुन जातो ?

उत्तर – सुनिल खरेदीखत करुन देतो.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ ने खरेदी केलेल्या क्षेत्रावर त्याचा ताबा आहे. मी न्यायालयात पहिल्यांदाच साक्ष देण्यासाठी आलो. या न्यायालयात माझे विरुध्द एक दावा होता. त्या दाव्यात माझा साक्षी पुरावा झालेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ भिसे हा भाबडा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी तसेच प्रतिवादी क्र. १ व मी एकाच कुटुंबातील असल्यामुळे वादी व प्रतिवादी क्र. १ ला सहकार्य करण्यासाठी मी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले व आज खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2025.06.16 17:23:21 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–१६.०६.२०२५

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परंडा